
VOL. 3
SPECIAL ISSUE 1
MARCH 2017

ISSN. 2454-5503
Impact factor : 3.012 (IIJIF)

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL



Special Issue On

# RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS IN PRESENT ERA

(Book I)

*Chief Editor*
**Dr. Shailaja Barure**

*Co Editor*
**Mr. Dhanaji Arya**

BY

GANDHIAN STUDIES CENTRE,
SHRI YOGESHWARI EDUCATION SOCIETY'S
SWAMI RAMANAND TEERTH MAHAVIDYALAYA,
AMBAJOGAI, DIST. BEED - 431517

IMPACT FACTOR: 3.012 (IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE

## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

VOL. 3 SPECIAL ISSUE 1 MARCH 2017

A Bimonthly Refereed International Journal

Special Issue On

# RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS IN PRESENT ERA

(Part – I)

CHIEF ORGANIZER

**Dr. Pravin Bhosle**

I/c Principal,

Swami Ramanand Teerth Mahavidyalaya

Ambajogai Dist. Beed

CHIEF EDITOR

**Dr. Shailaja Barure**

Director, Gandhian Studies Centre,

Dept. of Political Science,

Swami Ramanand Teerth Mahavidyalaya, Ambajogai

CO EDITOR

**Mr. Dhanaji Arya**

Head Dept. of English

Swami Ramanand Teerth Mahavidyalaya, Ambajogai

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

Web: www.mgsociety.in +91 9420079975 Email: chcskalyan@gmail.com

## अनुक्रमणिका....

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth Pin-431516
Ta. Sonpeth Dist. Parbhani

१. महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार / प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव / १२
२. महात्मा गांधीजींची ‘मूलभूत शिक्षण व्यवस्था’ -एक विवेचन / डॉ. भालेराव जे.के. / १७
३. महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान आणि भारतीय लोकशाही समोरील आव्हाने /प्रा. डॉ. शैलजा बरुरे / २१
४. ग्रामीण पुर्नबांधणीचा गांधीजींचा दृष्टीकोन/ प्रा.डॉ.घायाळ एस.पी. / ३२
५. महात्मा गांधी प्रणित ग्रामीण विकास / डॉ. पी.आर. थारकर / ३७
६. गांधीजीचे समता विषयक विचार / डॉ रंजनी अनंतराव बोरोळे / ४२
७. महात्मा गांधी आणि महिला सबलीकरण / अमित रामकृष्ण अरगडे / ४७
८. वर्तमानकालीन भारतीय समाजव्यवस्थेत गांधी तत्वज्ञानाची उपयुक्तता / प्रा. सुनिता टेंगसे / ५३
९. महात्मा गांधी आणि त्यांचे कृतिशील विचार : एक अभ्यास / प्रा.राम मायकर / ५९
१०. महात्मा गांधींचे समाजिक विचार / कु.पवार एस.एम. / ६३
११. खादी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग / सौ.कविता अभय पांडे / ६८
१२. Mahatma Gandhi as a social Reformer / सौ.प्रार्थना लोहेकर / ७०
१३. महात्मा गांधीचा ग्रामीण विकासाबद्दल दृष्टीकोन /डॉ.एम.डी. कच्छवे / ७३
१४. महात्मा गांधीजींचा समतेविषयक दृष्टिकोन / प्रा. जोगदंड एम.बी./ प्रा. गंगणे ए. यु. / ७७
१५. महात्मा गांधी आणि महिला विषयक दृष्टीकोन /प्रा.गडदे भारती बा. / ८२
१६. महात्मा गांधींच्या अध्यात्मनिष्ठ मानवतावादी विचारांची प्रासंगिकता / डॉ.नारायण तु.कांबळे / ८८
१७. महात्मा गांधीजींचे कृषी विषयक विचार/ देशमुख विठ्ठल शंकरराव / ९३
१८. महात्मा गांधीजींच्या बुनिवादी शिक्षण पध्दतीची विद्यमान काळातील प्रासंगिकता / डॉ. अरुण दळवे / ९५
१९. महात्मा गांधींचे शिक्षण विषय विचार / प्रा.गंगाधर चव्हाण, प्रा. संजय राठोड / १०२
२०. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि गांधीजी : एक अभ्यास / डॉ.के.व्ही.डोंगरगावकर / १०४
२१. महात्मा गांधीच्या ‘खेडयाकडे चला’ ऐतिहासिक हाकेचे मराठी साहित्यात स्थान / प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत / १०९
२२. महात्मा गांधीजींचे ग्रामस्वराज्यविषयी विचार / प्रा. घाडगे गौतम व्यं. / ११३
२३. गांधीजींच्या सत्याग्रहाची साधणे / श्रीमती एस. एन. जाधवर / ११९

# १३.

# महात्मा गांधीचा ग्रामीण विकासाबद्दल दृष्टीकोन

**प्रा. डॉ.एम.डी. कच्छवे**
संशोधन मार्गदर्शक
सहयोगी प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणी

**प्रस्तावना-** अहिंसात्मक आंदोलनाच्या माध्यमातून भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महात्माजींचा जन्म दोन ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरात मधील पोरबंदर येथे झाला. लग्न तेराव्या वर्षी झाले. महात्मा गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते व तत्वज्ञ होते. अहिंसात्मक असहकार आंदोलनानी गांधीजींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. भारतातील लोक त्यांना बापू म्हणत आणि त्यांना स्वतंत्र भारताचे राष्ट्रपिता मानले जाते. महात्मा गांधी यांची जयंती जगभरात 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून साजरी केली जाते. असहकार व अहिंसेचा तत्वावर आधारित सत्यागृहाचा उपयोग गांधीजीनी सर्वप्रथम दक्षिण अफ्रिकेमध्ये भारतीयांना त्यांचे नागरी हक्क मिळवून देण्यासाठी केला. भारतात त्यांनी १९१५ मध्ये चंपारण मधील शेतकऱ्यांना जुलुमी कर व जमीनदार यांच्या विरुध्द लढण्यासाठी एकत्र केले. १९२१ मध्ये त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सूत्रे हाती घेतली. १९३० मध्ये इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील कर विरोधात दांडी यात्रेचे प्रतिनिधीत्व केले. १९४२ मध्ये त्यांनी इंग्रजाविरुध्द भारत छोडो आंदोलन चालू केले. त्यांना अनेकदा तुरुंगातही जावे लागले. गांधीजीनी सत्य व अहिंसा पुरस्कार केला. त्यांनी खेड्यांना खऱ्या भारताचे मूळ म्हणून पाहीले. भारतात २ ऑक्टोबर हा 'गांधी जयंती' म्हणून साजरा करण्यात येतो.

इंग्लंडमध्ये कायद्याचा अभ्यास करत ते बॅरिस्टर बनले आणि भारतात परत येऊन वकिली करु लागले. गांधीजीनी अहिंसेच्या तत्वाला स्वदेशाची जोड दिली. त्यांनी सर्वांना विदेशी वस्तूंचा बहिष्कार करण्याचे आव्हान केले. या तत्वानुसार सर्व भारतीयांनी ब्रिटीश कपड्यांच्याऐवजी खादीच्या उपयोग करावा असे अभिप्रेत होते. चरख्यावर सूत कातावे असा गांधीजीचा आग्रह होता. या काळात त्यांनी समाजातील दारु, गरीबी आणि अस्पृश्यता कमी करण्याचे आपले प्रयत्न चालू ठेवले.

**संशोधनाचा उदेश :** सदर शोध निंबध खालील उदेश डोळ्यासमोर ठेवून करण्यात आला आहे.

१. ग्राम विकासाची संकल्पना स्पष्ट करणे.

Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS
Sonpeth
Pin-43151
Ta.Sonpeth Dist.Parbhani

२. ग्राम विकासा बदलच्या विचारावर प्रकाश टाकणे.
३. निष्कर्ष काढणे.

**अभ्यास पध्दती :**

सदर शोध निबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे. दुय्यम माहितीत दैनिक वर्तमानपत्रातील लेख, शोधनिबंध, संदर्भ ग्रंथ यांचा आधार घेतलेला आहे. वरील उद्देश डोळ्यासमोर ठेवून सामग्री संग्रहन केले आहे.

**गांधीजीचे ग्रामविकास बद्ल विचार :** ग्रामीण विकासातही शेती व्यवयास, पशुपालन, कुटीरोद्योग, ग्रामीण शिक्षण, ग्रामपंचायत, ग्रामीण पर्यावरण इत्यादी विषयावर महात्मा गांधीनी विचार मांडले आहेत. 'भारत हा खेड्याचा देश आहे.' खेडी ही भारताचा आत्मा आहे असे पटवून दिले. यामुळे त्यांनी 'खेड्याकडे चला ' हा संदेश दिला. १ जुलै, १९३६ मध्ये महात्मा गांधीनी हरिजन या वृतपत्रात लिहीले की, खेड्यांचा नाश म्हणजे भारताचा नाश आहे. भारतातील खेड्यांचा उध्दार करणे, सर्वांगिण विकास घडवून आणणे या मुलभूत हेतूसाठी महात्मा गांधीनी प्रयत्न केले. खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजेत. त्यांनी १८ मुद्याचा एक कार्यक्रम आखला. खेड्यातील उद्योगधंद्यांची वाढ, मुलभूत व प्रौढ शिक्षण, आरोग्य मागास वर्गाचा विकास, स्त्रियांचा उध्दार, राष्ट्रीय भाषांची वाढ, कामगार, किसान व विद्यार्थी यांच्या संघटना अशा बाबींचा समावेश होता.

या योजनांची अमलबजाणी करण्याची अखिल भारतीय ग्रामउद्योग मंडळ, अखिल भारतीय विणकर मंडळ, खादी विद्यालय सेवाग्राम, कालूपाटी येथे गांधी निकेतन, त्रिचुर येथे कस्तुरबा आश्रम इत्यादी संस्था अस्तित्वात आल्या. खादी संबंधीच्या योजनेचे चरखा चळवळीत रुपांतर झाले. हरिजन सवेक संघ, हिंदूस्थानी प्रचार संघ, सर्वोदय, भूदान चळवळ इत्यादी संघटना महात्मा गांधीच्या कल्पनेतूनच झाल्या. महात्मा गांधीच्या विधायक कार्यक्रमातून स्फूर्ती घेऊनच सर्वोदय कार्यक्रम आखण्यात आला.

**ग्रामोद्योग - कुटीरोद्योगांचे समर्थन :** भारतातील दारिद्रयाचा गांधीजीनी अभ्यास करुन देशात लहान - लहान ग्रामोद्योग - कुटीरोद्योग सुरु करावेत. असे त्यांना वाटत असे. ग्रामीण भागातील कारागिरांना संरक्षण देऊन त्यांच्या कौशल्यावर भर घालण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. खेडी स्वंयपूर्ण बनतील. उद्योगधंद्यामुळे विकास होईल.

**ग्राम विकास :** खेड्यात राहणाऱ्या शेती व्यवसाय करण्याऱ्यांनी उत्पादीत केलेले अन्नधान्य, फळ भाज्या, औषधी वनस्पती यावरच मानवी जीवन चालते. म्हणून ग्रामविकास होणे महत्वाचे आहे. लोकसंख्या दिवसेंदिवस वाढून त्यांच्या गरजाही वाढत आहेत. हे लक्षात घेवूनच कृषी उत्पादने वाढणेही महत्वाचे आहे. निसर्गाने

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq.Sonpeth Dist.Parbhani

आपल्या भारत भूमीत अनेक प्रकारची नैसर्गिक साधने भरभरुन दिली आहे. तांबे, जस्त, सिसे, चांदी, सोनं, माणिक, मोती, शंख, शिंपले इत्यादी जमीनीतून उपलब्ध होतात. प्राचीन काळापासून प्रत्येक गावात लोहार, सुतार, सोनार, कुंभार, कासार इत्यादी बारा बलूतेदार उदयास आले.

**ग्रामपंचायतीची निर्मीती :** ग्रामपंचायतीची म्हणजे खेड्यातील पंचमंडळीकडून कारभार पाहण्याचे मंडळ लोकशाहीत व्यक्तीस्वातंत्र्य महत्वाचे असते. ग्रामपंचायत प्रशासनाचा मुलभूत घटक असतो खेड्याची सत्ता खेड्यातच राहावी आणि ती लोकांच्या विकासासाठी वापरली जावी. यासाठी ग्रामपंचायत निर्माण करणे, गावाच्या विकासासाठी धोरण ठरविणे, आणि त्यांची अमलबजावणी करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला देणे आवश्सक आहे. गावाच्या सर्वांगिण विकासासाठी घरगुती व कुटीरोद्योगांना प्रोत्साहन देणे, गावाच्या विकासासाठी नियोजन करणे खोडी स्वंयपूर्ण बनविणे हा त्यांचा उदेश होता.

**ग्राम सफाई :** ग्रामसफाईच्याव्दारे गांधीजी अतिशय निरोगी अशा गावाची कल्पना करीत असत. गांधीच्यामते, गावातील लोकांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी ग्रामसफाई असणे आवश्यक आहे. ग्राम सफाईचे काम गावकऱ्यांनी करावे.

गावातील कचरा घटवून परिसर स्वच्छ करावा. तो जमीनीत पुरल्यास त्यापासून खत निर्माण होतो. तसेच पशूचे गोमुत्र आणि शेणचाही शेतीच्या विकासासाठी वापर करण्यात यावा. तलाव, विहीरी स्वच्छ करुन मनुष्य आणि पशुना पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे.

**श्रम प्रतिष्ठा :** 'ग्रामविकास' संकल्पनेत गांधीजीनी शारीरिक श्रमाला अत्यंत प्रतिष्ठा दिलेली आहे. गांधीजी स्वतःही श्रम प्रतिष्ठेबदल आग्रही होते. स्वतः वापरत असलेल्या पंचाचे सूत कातन्यापासून ते कुष्ठरोग्यांची सेवा करपर्यंत सर्व प्रकारची कामे गांधीजी स्वतः करत असत.

**ग्राम शिक्षण :** शिक्षणाविषयी गांधी यांचे विचार महत्वपूर्ण आहेत गांधीजींनी कृतीतून शिक्षण, स्वालंबन, मातृभाषेतून शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांनी प्राथमिक शिक्षणावर भर दिला.शिक्षणातून मानवाचा सर्वांगिण विकास साधला जातो. शिक्षण हे सर्व समाजासाठी, सर्वांच्या कल्याणासाठी आवश्यक असल्याचे गांधीची सांगत सुतारकाम, लोहारकाम, चांभार- काम, मातीकाम, शेतातील पिक इत्यादी व्यवसायांची माहिती शिक्षणातून दिली जावी असे त्यांचे मत होते.

**स्वदेशीचा वापर** : महात्मा गांधीनी स्वदेशी वस्तूचा वापर यामध्ये विशषतः खादी वापरावर मोठ्या प्रमाणावर भर दिला आहे. 'चरखा' हा ग्रामीण विकासाचे प्रतिक आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने चरखा चालवणे आवश्यक आहे. प्रत्येकांनी

आपल्याला लागणारे तेवढे कापड स्वतः तयार करावे. शाळेतून सतूकताई शिक्षण दिले जावे. यातून त्यांचे दारिद्रय दूर होईल. आयात कमी होऊन देश संपन्न होण्याचा मदत होईल.

**कृषी विकास :** भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रमुख क्षेत्र कृषिक्षेत्र होय. ग्रामीण भागात राहणाऱ्या जनतेच्या उपजिविकेचे शेती हे साधन आहे. त्यासाठी शेतीविकासाला महत्व देण्याची आवश्यकता आहे. कृषिबरोबरच कृषिपूरक व्यवसाय उदा. पशुपालन, कातडी, उद्योग, तेलगिरणी व इतर उद्योगाच्या विकासावर भर दिल्यास ग्रामीण विकासाला चालना मिळेल.

**ग्राम स्वराज्य :** महात्मा गांधी यांनी, ग्राम स्वराज्य संकपनेतून ग्रामीण भाग स्वयंपूर्ण असावा हा विचार मांडला. ग्रामीण - शहरी ही दरी कमी करण्याची ग्रामस्वराज्य संकल्पनेचा स्विकार केला जावा. आदर्श खेडी निर्माण करुन ग्रामीण उत्पादनाच्या आधारावर ग्रामीण उद्योगांना प्राधान्य दिले जावे. त्यातून ग्रामीण जनतेच्या गरजा ग्रामीण भागातच पूर्ण होतील.

**निष्कर्षः** गांधीजीनी आपले आयुष्य सत्याच्या शोधासाठी अर्पण केले होते. त्यांचे आत्मचरित्र सत्याचे प्रयोग या नावाखाली प्रसिध्द आहे. खादी व कुटीर उद्योगांना प्राधान्य देण्यात यावे,अन्नधान्याच्या बाबतीत खेडी स्वयंपूर्ण झाली पाहीजेत, गरीब व श्रीमंत यांच्या उत्पन्नातील विषमता कमी करणे, खेड्यातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे, आरोग्याच्या नियमांचे उल्लंघन करु नये, ग्रामीण जीवनात व्यक्तीला स्वावलंबनातून आपल्या गरजापूर्ण करता आल्या पाहीजेत.

❑❑❑

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani